जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अमरावती यांचे अधिनस्त आरोग्य संस्थामध्ये (रूग्णालयामध्ये) पुरविण्यात आलेल्या कंत्राटी वस्त्रधुलाई सेवेचे प्रलंबीत देयके अदा करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक:- देयके-२०२६/प्र.क्र. ४२/रुशआ-१ (ई.कॉम्प्युटर नं.१५४५००२)
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- २५ फेब्रुवारी, २०२६.

**वाचा:-**

१) सह संचालक, रुग्णालय (राज्यस्तर), आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्रमांक- आसेआ/कक्ष-३/टे-९/ न.क्र./वि.नि. ४०/वस्त्रधुलाई सेवा /४८८-४९०/२५ दि.१९.०१.२०२६

प्रस्तावना:-

जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अमरावती यांच्या अधिनस्त स्त्री रूग्णालय अमरावती, ग्रामीण रूग्णालय धामणगाव रेल्वे, चांदूरबाजार, चांदूर रेल्वे, अंजनगाव सुर्जी व उपजिल्हा रूग्णालय मोर्शी, अचलपूर, दर्यापूर, धारणी व सामान्य रूग्णालय अमरावती रूग्णालयामधील साई मल्टी सर्व्हीसेस, जळगांव यांनी वित्तीय वर्ष सन २०२१-२२ ते २०२३-२४ मधील माहे जानेवारी, २०२२ ते मार्च, २०२४ या कालावधीत पुरविलेल्या वस्त्रधुलाई सेवेचे वाचा येथील सहसंचालक, रूग्णालय (राज्यस्तर) यांच्या प्राप्त प्रस्तावानुसार प्रलंबित देयके अदा करण्यास कार्योत्तर मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

जिल्हा रुग्णालय, अमरावती यांच्या अधिनस्त स्त्री रूग्णालय अमरावती, ग्रामीण रूग्णालय धामणगाव रेल्वे, चांदूरबाजार, चांदूर रेल्वे, अंजनगाव सुर्जी व उपजिल्हा रूग्णालय मोर्शी, अचलपूर, दर्यापूर, धारणी व सामान्य रूग्णालय अमरावती रूग्णालयामधील साई मल्टी सर्व्हीसेस, जळगांव यांनी वित्तीय वर्ष सन २०२१-२२ ते २०२३-२४ मधील माहे जानेवारी, २०२२ ते मार्च, २०२४ या कालावधीत पुरविलेल्या कंत्राटी वस्त्रधुलाई सेवेचे एकुण रु.४८,६५,४२८/- (अक्षरी रुपये अठ्ठेचाळीस लक्ष पासष्ट हजार चारशे अठ्ठावीस फक्त) इतक्या रकमेचे प्रलंबित देयके अदा करण्यास खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

१) कार्यारंभ आदेशातील व करारातील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात आल्याचे खात्री करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील.

२) सदर प्रलंबित देयके अदा करताना वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचना/शासन निर्णय/परिपत्रके/नियम यांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील.

३) सदर देयके योग्य असल्याची तसेच प्रलंबित देयके दुबार अदा करण्यात आले नसल्याची खातरजमा करुनच अदायगी करण्यात यावी. याबाबतची जबाबदारी क्षेत्रीय कार्यालयाची राहील.

२. सदर देयकाचा खर्च सार्वजनिक आरोग्य विभाग, मागणी क्र. आर १, २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, २२१० ०१४६, २२१० ०४१३, २२१० ०२२६ व २२१० ४६२४ या लेखाशिर्षातील १३-कार्यालयीन खर्च या उद्दीष्टाखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक, विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, भाग-२ दि.१७ एप्रिल, २०१५ चे परिशिष्ट वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग - पहिला, उपविभाग - एक मधील अनुक्रमांक ६, नियम क्र.४० अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार व त्यात नमुद अटीची पुर्तता करण्याच्या अटीच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२२५१०४३४६८७१७ असा आहे. आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY DATTARAM MAHADESHWAR

Digitally signed by SANJAY DATTARAM MAHADESHWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=759D43D3CA03F08520A6D49169531E74206CD390898BBE0690FEAD8F00F6A3EB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=09A8917EDE715503310B61D8A24357A945B188F3A254ABA25AC8365BB66E4E8, cn=SANJAY DATTARAM MAHADESHWAR
Date: 2026.02.25 11:01:56 +05'30'

(संजय महाडेश्वर)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/ २ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये) राज्यस्तर, मुंबई.
५. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, अकोला.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
८. निवडनस्ती (रूशआ-१).